MHAH030066862016

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४५७४/२०१६**
**नि.क्र.२०**

**( न्यायनिर्णय )**
(घोषित दि.३०.०१.२०२६)

१. आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये खटला चालविण्यात आला.

२. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्र.१ अरुण रामचंद्र थोरात यांचा पुरावा निशाणी २० सोबत नोंदवला. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराचा पुराव्यात आरोपींविरुध्द पुरावा न मिळुन आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

३. प्रस्तुत खटल्यात खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेच्या आधारे देत आहे-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **उत्तरे** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय की, दि.०६.०६.२०१६ रोजी रात्री २१.३० वाजणेच्या सुमारास आरोपी मुकुंद आसाराम घुले यांच्या घरामध्ये, लकारे गल्ली, भिंगार, ता. जि. अहमदनगर, येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपी क्रं.१,३,५,६ व ९ हे इतर आरोपी क्रं.२,४,७ व ८ यांचेसह गोलाकार बसुन पत्याचे कॅटचे आधारे तिरट नावाचा जुगार खेळताना रोख रक्कम रु.१४,०६०/- व जुगार खेळण्याचे साहित्यांसह मिळुन आले ? | नकारार्थी ... |
| २. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात |

येते

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करिता -**

४. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाने हे सिध्द करणे गरजेचे आहे की, आरोपी हा विनापरवाना बेकायदा तिरट नावाचा जुगार खेळताना व खेळवितांना मिळून आला.

५. अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्र.१. अरुण रामचंद्र थोरात यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०६.०९.२०१६ रोजी २१:३० वा. पोलीसांनी त्यांना पंच म्हणुन बोलवले नव्हते. पंचनाम्यावर त्यांची सही त्यांनी ओळखली परंतु त्यातील मजकूराबाबत अज्ञान दर्शविले. सदर साक्षीदाराला सरकारी अभियोक्ता यांनी सुचक प्रश्न विचारले असता तथाकथीत जप्ती व पंचनामे सिध्द झालेले नाही. त्यामुळे पंचांची साक्ष अभियोग पक्षास फायद्याची ठरत नाही.

६. सदर केसमधील फिर्यादी, साक्षीदार व तपासी अंमलदार यांचा पुरावा पटलावर आलेला नाही. प्रस्तुत खटल्यात पंच साक्षीदार क्र.१ यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे पंचनामा सिध्द झालेला नाही. त्यामुळे पटलावर उपस्थित पुराव्यावरुन आरोपी सार्वजनिक ठिकाणी लोकांकडुन पैसे घेउन तिरट नावाचा जुगार व जुगाराचे साहित्य मिळून आले हे सिध्द होत नाही. तसेच या प्रकरणात स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष देखील नोंदविण्यात आलेली नाही. आरोपीविरुध्द गुन्हा निर्देषीत होईल असा कुठलाही पुरावा पटलावर नाही.

७. वरील सर्व पुराव्याचा विचार करता अभियोग पक्षाने सदर आरोपी सार्वजनिक ठिकाणी लोकांकडुन पैसे घेउन तिरट नावाचा जुगार खेळताना व खेळवितांना मिळून आला हे संशयापलीकडे जावुन ठोस पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही. त्यामुळे सदर आरोपीला महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) प्रमाणे गुन्ह्यासाठी जबाबदार धरता येणार नाही. त्यामुळे आरोपी क्र.२ हे निर्दोष मुक्त होण्यास

पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देते व मुद्दा क्र.२ च्या उत्तरात खालीलप्रमाणे आदेश करते.

## आदेश

१. आरोपी क्रं. १, ३, ५, ६ व ९ यांना महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१)नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी क्रं. १, ३, ५, ६ व ९ चे बंधपत्र व जातमुचलके रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपी क्रं. १, ३, ५, ६ व ९ ने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रत्येकी रु.१५,०००/-(रूपये पंधरा हजार मात्र) प्रमाणे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रकमेचे जामीनपत्र द्यावे.

४. गुन्हात जप्त रोख रक्कम रु.४९३०/- अपिल कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावी व जुगार संदर्भातील मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला)

दिनांक- ३०/०१/२०२६.
अहमदनगर.

(गजाला अल अमुदी)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय
क्र.१०, अहमदनगर.

प्रमाणपत्र

मी अशी खात्री देते की सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायनिर्णय प्रत्येक शब्द बरोबर आहेत-

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | जी.ए.खेडकर (नि.श्रेणी-२) |
| न्यायालयाचे नाव | : | अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,<br>न्यायालय क्रं.१०, अहमदनगर |
| दिनांक | : | ३०/०१/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी<br>सही केलेली दिनांक | : | ३१/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड<br>केल्याची तारीख | : | ३१/०१/२०२६ |